## SECTION - A

**Q 1) खालील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही पाच) (5)**

मित्रांनो, या सृष्टीचे मित्र बना. इवल्या-इवल्या पर्णावरचे दवबिंदू पाहा. ते मोती बघा आणि गवतातून कोळ्यांनी विणलेली जाळी! सूर्यकिरणांनी रंगलेली जणू सोनेरी मोत्यांच्या झालरी लावलेली पऱ्यांची ती हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे! बघा ती मौज आणि पहाटेच्या प्रशांत वेळी झाडांवरून थेंब पडतात. जणू अश्रू - ते ऐका. ते निळे डोंगर बघा. खोल दऱ्या, नद्या, नाले, तळी, वृक्षवेली, पाखरे- सारे पाहा. एखादे साधे फूल , परंतु किती सुंदर असते ते ! टेनिसन म्हणाला, "एक फूल जाणणे म्हणजे विश्वच जाणणे होय." फुलपाखरांच्या अंगावरची नक्षी बघा. फुलपाखरांच्या मागे धावा. कोकिळेला शोधत फिरा. घुबडांचे घुत्कार ऐका. नाचणारे मोर बघा. गायी , बैल, मांजरे - त्यांचे डोळे बघा. गंमत आहे.

खालचे वरचे सारे विश्व पाहा. आकाशातील रात्रीचे काव्य पाहा. वेदांमधील ऋषींनी मध्यान्हीच्या निळ्या आकाशाचेही वर्णन केले आहे . आम्ही पहाटेचेही पाहणार नाही, मग मध्यान्हीचा धगधगीतपणा, त्यातील प्रखर सौंदर्य पाहणे दूरच राहिले! तुम्हाला ताऱ्यांचे कधी आकर्षण वाटले आहे? निळ्या आकाशाने तुम्ही कधी वेडे झाले आहात? काजव्यांची कवाईत पाहिली आहे?- प्रकाशाची कवाईत. एखाद्या डोंगरावर बसावे. समोर अनंत क्षितिज असावे. आपल्या मनाला ही सृष्टी एका विशाल पाळण्यात घालून नाचवत आहे असे वाटते. या अनंत सृष्टीत मी वाढलो. तुम्हीही सृष्टीच्या अंतरंगात शिरा. तिच्याशी परिचय वाढवा. तुम्हाला तिची अनंत भाषा, अनंत छंद सारे कळू लागेल. अशा रीतीने अनेक अनुभव घ्यावे. अनुभवाने जीवन समृद्ध करावे.

1)लेखकाने कोळ्याच्या जाळ्यांना कशाची उपमा दिली आहे?

अ) मोत्यांच्या माळेची ब) पऱ्यांच्या मंदिरांची क) सूर्यकिरणांची

2)झाडांचे अश्रू कोणते?

अ) झाडांवरून पडणारे दवाचे थेंब ब) झाडांचे रडणे क) पहाटेची शांतता

3)'रात्रीचे काव्य' म्हणजे लेखकाला काय म्हणायचे आहे?

अ) रात्री गायले जाणारे गीत ब) चंद्र, ताऱ्यांनी सजलेले आकाश क) ढगाळ आकाश

4) मध्यान्ह – म्हणजे कोणती वेळ ?

अ) पहाट ब) संध्याकाळ क) दुपार

5) सृष्टीच्या अंतरंगात शिरणे म्हणजे काय ?

अ) निसर्गाविषयी सर्व माहिती जाणून घेणे. ब) जंगलांमध्ये आत आत जाणे. क) सृष्टीची मजा घेणे.

6) लेखकाने कोणाच्या कवाईतीचा उल्लेख केला आहे ?

अ) सूर्याच्या ब) काजव्यांच्या क) कोळ्याच्या

7) 'एक फूल जाणणे म्हणजे विश्वच जाणणे' असे कोणी म्हटले आहे?

अ) वेदांतील ऋषी ब) टेनिसन क) लेखक

प्र.२. कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. **(5)**

श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण ।
जेणें करितां बाणे खुण । सर्वज्ञपणाची ।।१।।
वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ।।२।।
जनीं आर्जव तोडू नये । पापद्रव्य जोडू नये ।
पुण्यमार्ग सोडू नये । कदाकाळीं ।।३।।
तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये ।
संतसंग खंडू नये । अंतर्यामीं ।।४।।
आळसें सुख मानूं नये । चहाडी मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य काही ।।५।।
सभेमध्ये लाजों नये । वाष्कळपणे बोलों नये ।
पैज होड घालूं नये । काहीं केल्या ।।६।।
कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विश्वासघात ।।७।।
व्यापकपण सांडू नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालू नये । कोणीयेकासी ।।८।।
सत्यमार्ग सांडू नये । असत्य पंथे जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ।।९।।
अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाडवावी ।
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।।१०।।

(१) कवितेच्या आधारे पुढील विधाने सत्य की असत्य, ते ओळखून विधानापुढे 'सत्य' / 'असत्य' असे लिहा.

1. अचानक पडलेली वस्तू दिसली तर ती उचलू नये. -
2. पैसा हा पैसा आहे, वाईट मार्गाने मिळवला तरी हरकत नाही. -
3. सभेमध्ये लाजू नये. -
4. स्वतःच्या भल्यासाठी इतरांचा विश्वासघात करणे अयोग्य नाही. –

(२) आकृती पूर्ण करा.

संत रामदासांच्या मते कधीही करू नयेत, अशा गोष्टी

**Q.3 ) सूचनेनुसार लिहा.**

**अ) सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही चार)** **(4)**

1) सर्वांनी नेहमी कष्ट करावे. (सर्वनाम ओळखा.)

अ) नेहमी ब) सर्वांनी क) कष्ट

2) आमचे गाव डोंगराच्या कुशीत होते. (क्रियापद ओळखा.)

अ) गाव ब) आमचे क) होते

3) गुरुदेव म्हणाले ,"महाराज तुम्ही राज्यात वेगाने सुधारणा केल्यात. (क्रियाविशेषण ओळखा.)

अ) गुरुदेव ब) तुम्ही क) वेगाने

4) मी चार देश फिरून आलो. ( अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण

5) शाब्बास ! विद्यार्थ्यांनी संपूर्ण शाळा स्वच्छ केली ! (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

अ) शब्दयोगी अव्यय ब) उभयान्वयी अव्यय क) केवलप्रयोगी अव्यय

**आ) सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही तीन )** **(3)**

1) आमच्या गावाला आदर्श गावाचा पुरस्कार मिळाला होता.(काळ ओळखा.)

अ) वर्तमानकाळ ब) भविष्यकाळ क) भूतकाळ

2) सूर्य पूर्वेस उगवतो. (काळ ओळखा.)

अ) भविष्यकाळ ब) भूतकाळ क) वर्तमानकाळ

3) खालीलपैकी कोणते वाक्य वर्तमानकाकाळातील आहे.

अ) हिरवे डोंगर खूप सुंदर होते. ब) हिरवे डोंगर खूप सुंदर आहेत.

क)हिरवे डोंगर सुंदर असणार.

4) मेहनती मुले यशस्वी होतात. (या वाक्याचे भविष्यकाळातील वाक्य निवडा.)

अ) मेहनती मुले यशस्वी होतील. ब) मेहनती मुले यशस्वी होत आहेत.

क) मेहनती मुले यशस्वी झाली.

**इ) सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही तीन )** **(3)**

1) पर्यावरणरक्षणासाठी सर्वांनी काय करावे.? (वाक्याचा प्रकार ओळखा) )

. अ) उद्गारवाचक ब) नकारार्थी क) प्रश्नार्थी

2) मंगेश वर्गात हजर आहे.( योग्य नकारार्थी वाक्य निवडा.)

अ) मंगेश वर्गात हजर नाही. ब) मंगेश वर्गात गैरहजर नाही.

क) मंगेश वर्गात गैरहजर आहे.

3) तुम्ही सर्वांनी अभ्यास करा. (वाक्याचा प्रकार ओळखा).

अ) आज्ञार्थी ब) उद्गारवाचक क) प्रश्नार्थी

4) अहाहा! किती सुंदर देखावा आहे हा ! (या वाक्याचे विधानार्थी वाक्य कोणते)

अ) हा देखावा फार सुंदर आहे. ब) हा देखावा सुंदर आहे काय?

क) वा ! सुंदर देखावा आहे हा.

**ई) समानार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन)** **(2)**

1) तट

अ) किनारा ब) पाणी क) नदी

2) परिचय

अ) प्रसिद्धी ब) ओळख क) प्रचिती

3) प्रगती

अ) हार ब) अधोगती क) भरभराट

**उ) विरुद्धार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन)) (2)**

1) तारीफ

अ) चहाडी ब) स्तुती क) निंदा

2) सुरुवात

अ) मध्य ब) शेवट क) प्रारंभ

3) उदास

अ) कष्ट ब) दुखः क) प्रसन्न

**ऊ) खालील शब्दांचे लिंग बदल करा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन)) (2)**

1) वाघ

अ) वाघीण ब) वाघ क) वाघरू

2) साधू

अ) सज्जन ब) संत क) साध्वी

3) गायक

अ) गौळण ब) गायिका क) गायकी

**ए) खालील शब्दांचे वचन बदल करा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन)) (2)**

1) मशाल

अ) मशाले ब) मशाल क) मशाली

2) शिंपला

अ) शिंपली ब) शिंपी क) शिंपले

3) मुलगी

अ) मुली ब) मुले क) मुलगे

**ऐ) खालील सामासिक शब्दांचा समास ओळखा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन) (2)**

1) पंचवटी

अ) द्विगू ब) अव्ययीभाव क) इतरेतर द्वंद्व

2) कपडालत्ता

अ) वैकल्पिक द्वंद्व ब) इतरेतर द्वंद्व क) समाहार द्वंद्व

3) यथाक्रम

अ) समाहार द्वंद्व ब) द्विगू क) अव्ययीभाव

**प्रश्न 4) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही पाच) (5)**

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कॅन्टीनच्या आचाऱ्याने तर माझ्या 'डायट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार'च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती.

घासाघासागणिक सहस्त्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते- म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती'तला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

1) प्रमोशन कोणाला मिळाले होते?

अ) अण्णा नाडगौडाला ब) भिकोबा मुसळेला क) कॅन्टीनच्या आचा-याला

2) व्रतभंगाचा प्रसंग कोणत्या दिवशी आला?

अ) पहिल्या ब) दुसऱ्या क) पाचव्या

3) भज्यांची ऑर्डर पुन्हा का दिली?

अ) भूक लागल्याने. ब) सगळ्यांच्या आग्रहामुळे.

क) भिकोबा मुसळेच्या टोमण्यामुळे.

4) खाल्लेले गोड का लागत नव्हते?

अ) मिठाईत साखर कमी होती. ब) मिठाई शिळी होती.

क) कॅलरीज पोटात चालल्या होत्या.

5) बिचारा ............. वर्षांनी एफिशिएन्सी बारच्या जाळ्यातून बाहेर पडला होता.

अ) सहा ब) सात क) चार

6) ' कमी करणे ' या अर्थाचा परिच्छेदात आलेला शब्द कोणता ?

अ) हादडणे ब) घटवणे क) चेकाळणे

**प्रश्न 5) खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही पाच) (5)**

अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ॥१॥
तैसा धांवें माझिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ॥२॥
सर्वेचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ॥३॥
भुकेलें वात्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ॥४॥

वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ॥५॥
नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ॥६॥

1) मेघाला विनवणी कोण करत आहे?

अ) वासरू ब) चातक क) माता

2) हरणी चिंतित होते कारण ............

अ) पाडस वणव्यात सापडते. ब) पाडस जंगलात हरवते .

क) पाडस खाली पडते.

3) पक्षिणी कुठे झेप घेते?

अ) पिल्लू धरतीवर पडल्यावर ब) पिल्लू आकाशात उडाल्यावर

क) झाडावर

4) वरील संतवाणीत कोणत्या नाते संबंधाचा उल्लेख आलेला आहे?

अ) मुलगा-वडील ब) आई-बाळ क) आजी-नातू

5) कवितेत मातेचे वर्णन कसे केले आहे.?

अ) कनवाळू ब) दयाळू क) प्रेमळ

6) भुकेलेल्या वासरासाठी गाय काय करते?

अ) मायेने जवळ घेते. ब) हंबरत धावत जाते. क) सोबत झेपावते.

## SECTION - B

**प्रश्न 6) अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(3)**

1) बाळासाठी लेखकाने कोणती शाल काढली?
2) अब्दुलला चिठ्ठी कोणी वाचून दाखविली?
3) लेखक अंधेरीच्या गोठ्यात का जाऊ लागले?
4) लेखकाचा माध्यमिक शिक्षणाचा टप्पा कोणत्या शाळेतून सुरु झाला?
5) ललितकलांचा पाया कोणाला म्हटले जाते?

**आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही तीन)** **(3)**

1) पुढे वाईला ............अध्यक्ष म्हणून मी गेलो.
2) कुटुंबाचा मात्र माझ्या ------- बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता.
3) अब्दुलच्या सत्कारातील फुलदाणी ------लोकांनी तयार केली होती.
4) आयुष्याच फार मोठं --------- मला भावे सरांच्या या शिकवणीतून गवसलं.
5) निरंजनची गुरुजींवर अपार............. होती.

**इ) खालील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)** **(4)**

1) प्रवासवर्णनाने स्वतःबद्दल कोणती माहिती दिली?
2) "माझे संस्कारकेंद्र डोळ्यांसमोर उभे राहते" असे लेखकाने का म्हटले आहे.?

3) पहाटेच्या अभ्यासाचा निरंजनला कोणता अनुभव आला?

4) दाजीसाहेबांनी अब्दुलचे कौतुक कोणत्या शब्दात केले?

**प्रश्न 7) अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(3)**

1) कवीची जिंदगी कशात बरबाद झाली ?

2) सैनिकाचे औक्षण कशाने केले जाते ?

3) कवीच्या साहाय्यास कोण धावून आले.?

4) कवी कशाचा हिशोब करत आहे. ?

5) सैनिकांवर काय घोंघावत असतो ?

**आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही तीन)** **(4)**

1) ------- विचार हरघडी केला. .

2) हे ........ माझे सर्वस्व .

3) तुझ्या विजयाची .........डोळे भरून पहावी.

4) अशा ----ज्योतींची तुझ्यामागून राखण.

5) धडाड्त्या तोफातून तुझे पाऊल -------

**इ) खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** **(2)**

1) झोतभट्टीत शेकावे पोलाद ,
तसे आयुष्य छान शेकले

2) तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान

**प्रश्न 8) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(2)**

1) कोणती प्रवृत्ती चुकीची आहे असे होमी भाभा यांनी म्हटले आहे?

2) लेखक डॉक्टर अनिल काकोडकर यांना कोणत्या प्रक्रियेवर काम करण्यास सांगण्यात आले?

3) बार्क हे कशाचे लघुरूप आहे?

**प्रश्न 9) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **(8)**

1) **रेल्वे स्टेशनवरील फेरफटका**. -- मुद्दे ----नातेवाईकांना आणण्यासाठी जाणे ------रेल्वे यायला वेळ असणे ---- फेरीवाले ,विक्रेते ,लोकांची गर्दी. काही व्यक्ती परगावी जाणे ---- संमिश्र भावना

2) **वर्गातील फळ्याचे आत्मवृत्त**.-- मुद्दे ----शिक्षकांचा सखा .....शाळेत एक विशेष स्थान --- वेगवेगळ्या तासाला वेगवेगळे शिक्षण ----- काही विद्यार्थ्यांकडून दुरुपयोग ----- सुट्टीत कंटाळवाणे वाटणे -----आताची अवस्था ----- आवश्यक काळजी .

3) **वीज बंद पडली तर**. मुद्दे - अत्यावश्यक गरज ----लहान मोठे उद्योग धंदे महत्वाचे ----- वीज बंद पडल्याने होणारे नुकसान ----------विजेची बचत आवश्यक ------त्यासाठी पाण्याचीही बचत आवश्यक .

**प्रश्न 10) अ) खालील मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक व तात्पर्य लिहा. (कोणतीही एक )** **(7)**

एका जंगलात एक साधू राहत होते .......साधूची वृत्ती परोपकारी ---- मुसळधार पाऊस ---एक वाटसरू -----झोपडीचे दार वाजविणे-----साधूने झोपडीत घेणे ----झोपडी लहान-----आणखी काही वाटसरुंनी दार वाजविणे -----साधूने आत घेणे------ खूप अडचण होणे----- उभ्याने रात्र काढणे ----पाऊस थांबणे ----- सगळ्यांनी विचार करणे----- अडचणीत नेहमीच एकमेकांना साथ देणे.

**किंवा**

एक मुंगी ------तळ्यात पडते ------बाहेर निघता येत नाही -------काठावर झाड ----- झाडावरील कबुतराला मुंगीची दया येणे --------झाडाचे पान पाण्यात टाकणे-----मुंगीचे त्याआधारे काठावर येणे ---काही दिवसांनी एका शिकाऱ्याने कबुतारावर नेम धरणे --------- मुंगीने शिकाऱ्याला चावा घेणे. उपकाराची परतफेड.

**आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **(5)**

मयूर / मालती कुळकर्णी, शारदा विद्यालय सांगली , शाळेत साजऱ्या होणाऱ्या पर्यावरणदिनानिमित्त रोपांची मागणी करणारे पत्र 'मेघल रोपवाटिका', गणेशनगर सांगली यांना लिहितो / लिहिते .

**किंवा**

विराज /विजया काळे २४०, सहकारनगर, पुणे येथून आपल्या राहत्या भागात मोकाट कुत्र्यांचा अतिशय त्रास होत असल्याने, महानगरपालिका पुणे यांना तक्रार पत्र लिहितो/ लिहिते .

[redacted]

Model

[redacted]

**Section A**

| प्र श्न | उपप्रश्न | अपेक्षित उत्तरे | गुणदान |
|---|---|---|---|
| | | स्वभाषेत उत्तरे अपेक्षित. आकलनानुसार विषयानूरूप उत्तर अपेक्षित | |
| | | | |
| **1** | | खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडा. (कोणतेही पाच) | **5** |
| | 1 | पऱ्यांच्या मंदिरांची | 1 |
| | 2 | झाडांवरून पडणारे दवाचे थेंब | 1 |
| | 3 | चंद्र ताऱ्यांनी सजलेले आकाश | 1 |
| | 4 | दुपार | 1 |
| | 5 | निसर्गाविषयी सर्व माहिती जाणून घेणे. | 1 |
| | 6 | काजव्यांच्या | 1 |
| | 7 | टेनिसन | 1 |
| | | | |
| **2** | | कवितेच्या आधारे सूचनेनूसार कृती करा. | **5** |
| | (१) | कवितेच्या आधारे पुढील विधाने सत्य की असत्य, ते ओळखून विधानापुढे 'सत्य' / 'असत्य' असे लिहा | **4** |
| | 1 | सत्य | 1 |
| | 2 | असत्य | 1 |
| | 3 | सत्य | 1 |
| | 4 | असत्य | 1 |
| | (२) | आकृती पूर्ण करा. | **1** |
| | 1. | फळ ओळखून खावे | 1/2 |
| | 2. | नेहमी सज्जनांची संगत धरावी | 1/2 |
| **3** | अ) | सूचनेप्रमाणे योग्य उत्तर निवडा. (कोणतेही चार) | **4** |
| | 1) | सर्वांनी | 1 |
| | 2) | होते | 1 |
| | 3) | वेगाने | 1 |
| | 4) | विशेषण | 1 |
| | 5) | केवलप्रयोगी अव्यय | 1 |
| | आ) | सूचनेप्रमाणे योग्य उत्तर निवडा. (कोणतेही तीन) | **3** |
| | 1) | भूतकाळ | 1 |
| | 2) | वर्तमानकाळ | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 3) | हिरवे डोंगर खूप सुंदर आहेत . | 1 |
| | 4) | मेहनती मुले यशस्वी होतील. | 1 |
| | **इ)** | **सूचनेप्रमाणे योग्य उत्तर निवडा. (कोणतेही तीन)** | **3** |
| | 1) | प्रश्नार्थी | 1 |
| | 2) | मंगेश वर्गात गैरहजर नाही. | 1 |
| | 3) | आज्ञार्थी | 1 |
| | 4) | हा देखावा फार सुंदर आहे. | 1 |
| | **ई)** | **समानार्थी शब्दांसाठी योग्य उत्तर निवडा. (कोणतेही दोन)** | **2** |
| | 1) | किनारा | 1 |
| | 2) | ओळख | 1 |
| | 3) | भरभराट | 1 |
| | **उ)** | **विरुद्धार्थी शब्दांसाठी योग्य उत्तर निवडा. (कोणतेही दोन)** | **2** |
| | 1) | निंदा | 1 |
| | 2) | शेवट | 1 |
| | 3) | प्रसन्न | 1 |
| | **ऊ)** | **योग्य उत्तर निवडा. (कोणतेही दोन)** | **2** |
| | 1) | वाघीण | 1 |
| | 2) | साध्वी | 1 |
| | 3) | गायिका | 1 |
| | **ए)** | **सूचनेप्रमाणे योग्य उत्तर निवडा. (कोणतेही दोन )** | **2** |
| | 1) | मशाली | 1 |
| | 2) | शिंपले | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 3) | मुली | 1 |
| | **ऐ)** | **सामासिक शब्दांचा समास ओळखा. (कोणतेही दोन)** | **2** |
| | 1) | द्विगू | 1 |
| | 2) | समाहार द्वंद्व | 1 |
| | 3) | अव्ययीभाव | 1 |
| | | पठित गद्यांश | |
| **4** | | **खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडा. (कोणतेही पाच)** | **5** |
| | 1) | अण्णा नाडगौडाला | 1 |
| | 2) | दुसऱ्या | 1 |
| | 3) | भिकोबा मुसळेच्या टोमण्यामुळे. | 1 |
| | 4) | कॅलरीज पोटात चालल्या होत्या. | 1 |
| | 5) | सहा | 1 |
| | 6) | घटवणे | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पठित पद्यांश | |
| 5 | | **खालील कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडा. (कोणतेही पाच)** | 5 |
| | 1) | चातक | 1 |
| | 2) | पाडस वणव्यात सापडते. | 1 |
| | 3) | पिल्लू धरतीवर पडल्यावर | 1 |
| | 4) | आई - बाळ | 1 |
| | 5) | कनवाळू | 1 |
| | 6) | हंबरत धावत जाते. | 1 |
| | | | |
| | | **SECTION-B** | |
| 6 | **अ)** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | **3** |
| | 1) | बाळासाठी लेखकाने 'पुलकित' शाल काढली. | 1 |
| | 2) | अब्दुलला चिठ्ठी रघुभैयाने वाचून दाखविली. | 1 |
| | 3) | लेखक अंधेरीच्या गोठ्यात धारोष्ण दूध आणायला जाऊ लागले. | 1 |
| | 4) | लेखकाचा माध्यमिक शिक्षणाचा टप्पा युनियन हायस्कूल मुंबई या शाळेतून सुरु झाला. | 1 |
| | 5) | ललितकलांचा पाया म्हणजे कथा. | 1 |
| | **आ)** | **रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (कोणतेही तीन)** | **3** |
| | 1) | विश्वकोशाचा | 1 |
| | 2) | डाएटच्या | 1 |
| | 3) | तपोवनातील | 1 |
| | 4) | तत्वज्ञान | 1 |
| | 5) | श्रद्धा | 1 |
| | **इ)** | **खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | **4** |
| | 1) | पाठ - रंग साहित्याचे<br>एखाद्या ठिकाणी प्रवास करून आल्यानंतर प्रेक्षणीय ठिकाणांची माहिती वाचकापर्यंत पोहचवतो.<br>ही माहिती कंटाळवाणी होऊ न देता रंजक पद्धतीने मांडणे, लेखक त्या ठिकाणच्या माहितीबरोबर स्वतःचे अनुभव, भावना निसर्गसौंदर्य,व्यक्तिविशेष यांचीही सुरेख मांडणी करतो. तिकीट व व्हिसा शिवाय कुठेही जाऊ शकतो, अनेक मोठया लेखकांमुळे प्रसिद्धी. | 2 |
| | 2) | पाठ - उर्जाशक्तीचा जागर, लेखक- डॉ. रघुनाथ माशेलकर<br>लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी शिक्षकांनी उत्तम मार्गदर्शन केले,आयुष्याच्या उभारणीत शाळा, शिक्षक, आई यांनी आत्मविश्वास,जगण्याचे भान दिले, फिरून ते दिवस आठवताना, संघर्षाचे दिवस आठवतांना लेखकांच्या डोळ्यासमोर संस्कार केंद्र शाळा, शिक्षक, आई आदराने डोळ्यापुढे उभे राहतात . | 2 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 3) | पाठ - खरा नागरिक, लेखक - सुहास बारटक्के<br>पहाटेची वेळ अभ्यासासाठी योग्य असते. पुरेशा विश्रांतीमुळे शरीरही ताजतवानं बनलेलं असतं ,प्रसन्न वातावरणात अभ्यासात मनही लागते. हवेत सुखद गारवा असतो. आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा श्लोक चटकन पाठ होतो. न कळलेले गणितही चटकन कळते. हा अनुभव निरंजनला आला. | 2 |
| | 4) | पाठ - चुडीवाला, लेखक - जयश्री रुईकर<br>"अब्दुल मियांनी आनंदाने तपोवनात येण्याचे आश्वासन दिले. येथील भगिनीच्या जीवनात ते आनंदाचा वर्षाव करतात, कुठलाही मोबदला न घेता संक्रांतीला जेष्ठ पौर्णिमेला येतात. अब्दुलमियांची समाजसेवा, मानवसेवा मोठी आहे." अशा शब्दांत दाजीसाहेबांनी अब्दुलचे कौतुक केले. | 2 |
| | | **टीप. प्रश्न क. ६ इ. साठी पाठाची प्रस्तावना आवश्यक** | |
| **7** | **अ)** | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन)** | **3** |
| | 1) | कवीची जिंदगी भाकरीचा चंद्र शोधण्यातच बरबाद झाली. | 1 |
| | 2) | डोळ्यातील आसवांच्या ज्योतींनी सैनिकाचे औक्षण केले जाते. | 1 |
| | 3) | कवीच्या सहाय्यास अश्रू धावून आले. | 1 |
| | 4) | डोईवर किती उन्हाळे राहिले आहेत याचा हिशोब कवी करत आहे. | 1 |
| | 5) | सैनिकांवर बंबारा घोंगावत असतो. | 1 |
| | **आ)** | **रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (कोणतेही तीन)** | **3** |
| | 1) | दुनियेचा | 1 |
| | 2) | हात | 1 |
| | 3) | दौड | 1 |
| | 4) | असंख्य | 1 |
| | 5) | जिद्दीचे | 1 |
| | **इ)** | **खालील पैकी कोणत्याही एकाचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा.** | **2** |
| | 1) | **संदर्भ**: कवी - नारायण सुर्वे, कवितेचे नाव - दोन दिवस<br>**स्पष्टीकरण**: या जगाने बऱ्या, वाईट सगळ्या गोष्टी शिकवल्या. दुख कसे पेलावे, कसे जगावे हे शिकविले. झोतपट्टीत पोलाद शेकल्यावर जसे पक्के होते, तसे कवीचे आयुष्य या जगात शेकले गेले. | 2 |
| | 2) | **संदर्भ**: कवयित्री - इंदिरा संत, कवितेचे नाव - औक्षण<br>**स्पष्टीकरण**: सैनिकाच्या शौर्यापुढे आम्ही अगदीच लहान आहोत. कवयित्री म्हणतात, सैनिकावर जीव ओवाळावासा वाटतो. सैनिकाच्या पराक्रमापुढे आमच्या जीवाची शान अगदी साधारण आहे. | 2 |
| | | **टीप. संदर्भ आणि स्पष्टीकरण यांचा उल्लेख आवश्यक** | |
| **8** | | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | **2** |
| | 1) | बॉस ने सांगितले तेवढेच काम करायचे आणि सांगितले नसेल तर आपल्याला कामच नाही असे समजायचं हे चूक आहे, ही प्रवृत्ती गेली पाहिजे. | 1 |
| | 2) | लेखकाला 'मेटलायझिंग' प्रक्रियेवर' काम करण्यात सांगण्यात आले. | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 3) | 'बार्क' हे 'भाभा एटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. | 1 |
| | | | |
| 9 | | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा.** | 8 |
| | | **मुद्दे-** | |
| | | विषयज्ञान, तर्कशक्ती, उपयोजन, कौशल्य, मुद्देसूद मांडणी. | |
| | | आकर्षक प्रारंभ व शेवट. | |
| | | म्हणी, वाक्प्रचार /काव्यपंक्ती यांचा यथायोग्य वापर. | |
| | | हस्ताक्षर व शुद्धलेखन. | |
| | | विरामचिन्हांचा योग्य वापर. | |
| | | वरील मुद्द्यांचा सारासार विचार करून एकत्रित गुणदान करावे. | |
| 10 | अ) | **खालील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला समर्पक शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | 7 |
| | | **मुद्दे-** | |
| | | कथेला समर्पक शीर्षक. | |
| | | आकर्षक प्रारंभ. | |
| | | ओघवती भाषाशैली, उत्कंठावर्धक मांडणी. | |
| | | मुद्देसूद मांडणी कल्पकता, रंजकता. | |
| | | संवाद व विरामचिन्हांचा यथायोग्य वापर. | |
| | | समर्पक शेवट. | |
| | | तात्पर्य | |
| | | वरील मुद्द्यांचा सारासार विचार करून एकत्रित गुणदान करावे. | |
| | आ) | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | 5 |
| | | पत्र लेखनासाठी आवश्यक बाबी- | |
| | | दिनांक पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा. | |
| | | मायना - ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे. | |
| | | विषय - मोजक्या शब्दात असावा. | |
| | | मजकूर - मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा, समर्पक, मुद्देसूद रचना असावी, पाल्हाळ नसावा, भाषा व्यवहारिक व भारदस्त असावी. | |
| | | शेवट व स्वाक्षरी - पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठविणाऱ्याची स्वाक्षरी व पत्ता असावा. | |
| | | पत्र लेखनात दोन्ही पत्ते, दिनांक, विषय या सर्व गोष्टी डाव्याबाजूलाच लिहाव्यात. | |
| | | टीप - लिफाफा आवश्यक.(हे पत्रलेखन आहे इ-मेल नाही) | |